## प्रेसनोट दि.११/०९/२०२६

# पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ -०२, मुंबई.
# पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई.

## एम.डी. अंमली पदार्थ विक्री करणारे ०३ आरोपी अटक करून त्यांचेकडून ड्रग निर्मितीचे साहित्य जप्त केलेबाबत

दिनांक ०५/०९/२०२६ रोजी पायधुनी पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने गस्त करीत असताना जंजिकर स्ट्रीट, २ रा माळा, हॉटेल जोडीया, मस्जिद बंदर पश्चिम, मुंबई ०३ या ठिकाणी छापेमारी करून Mephedrone Drugs (एम.डी) हा अंमली पदार्थ बाळगणा-या ०२ इसमांना ताब्यात घेवून अटक केलेली होती. गुन्हयाच्या पुढील तपासामध्ये आणखी ०१ आरोपीतास धोबी गल्ली,पायधुनी येथून अटक करण्यात आलेली आहे.

**१) आरोपी नामे कपिल गुलशन अरोरा, वय ३९ वर्षे,**

**२) आरोपी नामे मोहम्मद आसीफ इक्बाल शेख, वय ४४ वर्षे,**

**३) सईद अस्लम शेख वय ३३ वर्षे**

**उपरोक्त आरोपी हे सराईत गुन्हेगार आहेत.**

**उपरोक्त नमुद आरोपीतांकडुन अद्यापावेतो एकुण ४३५.१० ग्रॅम वजनाचा Mephedrone Drugs (एम.डी) हा अंमली पदार्थ हा (अंदाजे किंमत १३,०५,३००/- रूपये) जप्त करण्यात आलेला असुन, तपासा दरम्यान आरोपीकडून हा उल्हासनगर, जि.ठाणे येथील घरातून Mephedrone Drugs (एम.डी) निर्मिती करण्याचे साहित्य जप्त करण्यात आलेले आहे.**

सदरची गुन्हयाची उत्कृष्ट कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री.मनोजकुमार शर्मा ( कायदा व सुव्यवस्था ), मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग ), मा.पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर.(दक्षिण परिमंडळ ०२), सहाय्यक पोलीस आयुक्त पायधुनी विभाग श्रीमती रेणूका बूवा यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पायधुनी पोलीस ठाणे, लक्ष्मीकांत साळुंखे, पोलीस निरीक्षक अजय कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण मांढरे, पो.ह.वा ९८०६७३ /खान, पो. ह. क्र. ०३१५१८/शिंत्रे, पो.ह.वा. ०८०२०४/ शेंडे, पो.ह.क्र. ०८०९३१/ घोडे, पो.ह.क्र. ०९०४५३/वाक्से, पो.शि.क्र. ०९३४८०/तुंडीवाले, पो.शि.क्र.०९२८९०/ जाधव, पो.शि.क्र. ११०२८८/इतापे, पो.शि.क्र. १४०१५३/पाटील, पो.शि.क्र. १४०५५१/सांगळे, पो.शि.क्र. १५०४७७/ लोके यांनी केली आहे.